रयत शिक्षण संस्थेचे

# डी.पी.भोसले कॉलेज,कोरेगाव

## पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग व
## शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर आयोजित

## 'लोकसंस्कृतीच्या उपासकांचे सांस्कृतिक,सामाजिक व वाङ्मयीन अधिष्ठान'

### एक दिवसीय आंतरविद्याशाखीय मराठी राष्ट्रीय चर्चासत्र

### सोमवार दि.२१ नोव्हेंबर २०२२

## अहवाल

पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग डी. पी. भोसले कॉलेज , कोरेगाव व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ , कोल्हापूर यांच्या सामंजस्य करारा अंतर्गत **'लोकसंस्कृतीच्या उपासकांचे सांस्कृतिक , सामाजिक व वाङ्मयीन अधिष्ठान'** या विषयावर एक दिवसीय आंतरविद्याशाखीय मराठी राष्ट्रीय चर्चासत्रा चे आयोजन सोमवारदि. २१ नोव्हेंबर २०२२ रोजी करण्यात आले. या प्रसंगी उदघाटक म्हणून भटके-विमुक्त विकास परिषद महाराष्ट्र राज्याच्या अध्यक्ष व मागासवर्गीय आयोग महाराष्ट्र राज्याच्या सदस्या डॉ. सुवर्णा रावळ या उपस्थित होत्या . अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. विजयसिंह सावंत हे होते. त्यांनी उपेक्षित व वंचित घटकांच्या शिक्षणासाठी रयत शिक्षण संस्थेने केलेल्या कार्याला उजाळा दिला.यावेळीशिवाजी विद्यापीठ मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे उपाध्यक्ष डॉ.अशोक तवर , राष्ट्रीय भटक्या-विमुक्त जाती-जमाती महासंघाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बालाघाटे , उपप्राचार्य डॉ. एस. डी. जाधव, डॉ. एस. एन. कोळेकर,विभाग प्रमुख डॉ. बाळासाहेब चव्हाण यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बाळासाहेब चव्हाण मराठी विभाग प्रमुख डी.पी. भोसले कॉलेज कोरेगाव यांनी केले. याप्रसंगी सूत्रसंचालन प्रा.शैला माने, प्रा.साधना पाटील, प्रा.शिवानी क्षीरसागर व आभार प्रा.डॉ. देवानंद सोनटक्के सर यांनी मानले.बीजभाषणामध्ये डॉ. सुवर्णा रावळ यांनी भटके विमुक्त हे धर्म-संस्कृतीचे नुसते उपासक नाहीत , तर ते संवर्धक , प्रचारक व रक्षक आहेत. त्यांच्यातील लोककलावंतानीच धर्म-पुराणे व कथा जनमानसांपर्यंतपोचवल्या. चुकीच्या शिक्षण पद्धतीमुळे भटके-विमुक्त मुख्य प्रवाहाबाहेरअसून त्यांना प्रवाहात आणण्यासाठी अधिक प्रयत्न केले पाहिजे त असे प्रतिपादन, डॉ. सुवर्णा रावळ यांनी केले.

प्रथम सत्रात साधन व्यक्ती डॉ.संजय बालाघाटे यांनी, ' भटक्या-विमुक्तांनी कृषी संस्कृतीच्या आध्यात्मिक व भौतिक संस्कृतीची उभारणी केली. पहिला राष्ट्रीय उठाव भटक्यांनी केल्यामुळे त्यांना ब्रिटिशांनीक्रिमिनल ठरवले. आजपर्यंत ६ राष्ट्रीय आयोग , ५ राज्य समित्या स्थापन होऊनही त्यांच्या आयुष्यातील भटकंती अजून संपली नाही. त्यामुळे भटक्या-विमुक्तांचा लढा हा अस्मितेचा नाही, तर अस्तित्वाचा आहे.' असे सांगितले. अध्यक्षस्थानी शिवाजी

विद्यापीठ मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे  हे होते. सूत्रसंचालन प्रा.डॉ.बळवंत मगदूम,व आभारप्रदर्शन  उपप्राचार्य, डॉ.सुनील जाधव यांनी केले.

द्वितीय सत्रात खुले शोधनिबंध वाचन घेण्यात आले. या सत्राच्या अध्यक्ष स्थानी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे उपाध्यक्ष डॉ.अशोक तवर हे होते. सत्रसंयोजन व पाहुण्यांचा परिचय डॉ. देवानंद सोनटक्के यांनी व  आभारप्रदर्शन प्रा. सचिन निकम यांनी केले.

तृतीय सत्रात   लोकसंस्कृतीच्या उपासकांच्या **कला सादरीकरणाच्या**  कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून मा.प्रो.डॉ.सुवर्णारावळ या उपस्थित होत्या. याप्रसंगी   शिवाजी विद्यापीठ मराठी विभागप्रमुख डॉ.   नंदकुमार मोरे  यांनी लोककलांच्या संवर्धन-जतनासाठी शिवाजी विद्यापीठ करत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. यावेळी महाराष्ट्राच्या विविध भागातून आलेल्या भटक्या-विमुक्तांतील   लोककलावंतानी  भारुड, गोंधळ-जागरण , लावणी, वासुदेव,  पोतराज, वाघ्यामुरळी, असे विविध ११   लोककलाप्रकार सादर केले. चर्चासत्रात विविध   विद्यापीठातील, महाविद्यालयातील विद्यार्थी ( Student Beneficiary117), प्राध्यापक (  Teachers beneficiary65), वकलावंत (  Stake Holder beneficiary48) असे एकूण **230** लोक  सहभागी झाले होते.

या चर्चासत्रास महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्षव पदाधिकारी, एक्स डीपीएन्स असोसिएशनचे अध्यक्ष व पदाधिकारी, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे प्रतिनिधी,  विविध सेवाभावी संस्थांचे अध्यक्ष व पदाधिकारी याच बरोबर महाविद्यालयातील इंग्रजी विभागप्रमुख डॉ. भगवान लोकडे,    भूगोल विभागप्रमुख डॉ. संजय यादव,   हिंदी विभागप्रमुख प्रा.राबन मुल्ला, इतिहास विभागप्रमुख मधु महाले,अर्थशास्त्र विभागप्रमुख सचिन निकम, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. बाळकृष्ण भोसले, कार्यालयीन अधीक्षक विद्याधर कांबळे,  बी सी.ए.विभागप्रमुख प्रा. केतन जाधव, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. ढोपे सर तसेच शिक्षक व शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते. चर्चासत्राचे संयोजन प्राचार्य, डॉ. विजयसिंह सावंत  यांच्या मार्गदर्शनाखाली, संयोजक विभागप्रमुख डॉ. बाळासाहेब चव्हाण, समन्वयक डॉ. देवानंद सोनटक्के व सहकारी प्रा. साधना जाधव  व प्रा. महेश आवळे यांनी केले.



भटके-विमुक्त विकास परिषद महाराष्ट्र राज्याच्या अध्यक्ष  व मागासवर्गीय आयोग महाराष्ट्र राज्याच्या सदस्या डॉ. सुवर्णा रावळ यांचे स्वागत करताना प्राचार्य विजयसिंह सावंत साहेब




राष्ट्रीय भटक्या-विमुक्त जाती-जमाती महासंघाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बालाघाटे आपले विचार व्यक्त करताना







लोकसंस्कृतीचे उपासक आपली कला सादर करताना

रयत शिक्षण संस्थेचे

डी.पी.भोसले कॉलेज,कोरेगाव

पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग व

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर आयोजित

‘लोकसंस्कृतीच्या उपासकांचे सांस्कृतिक, सामाजिक व वाङ्मयीन अधिष्ठान’

एक दिवसीय आंतरविद्याशाखीय मराठी राष्ट्रीय चर्चासत्र

सोमवार दि.२१ नोव्हेंबर २०२२

## उदघाटन समारंभ :

सकाळी : ९.३० ते ११

प्रास्ताविक व स्वागत

**प्रा. डॉ. बाळासाहेब चव्हाण**

(प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग, डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव

बीजभाषण

मा. प्रो. डॉ. सुवर्णा रावळ

(बी. एन. एन. कॉलेज, भिवंडी, मुंबई)

अध्यक्ष,भटके-विमुक्त विकास परिषद,महाराष्ट्र राज्य.

सदस्य, मागासवर्गीय आयोग, महाराष्ट्र राज्य

**अध्यक्ष**

मा. डॉ. विजयसिंह सावंत

( प्राचार्य, डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव )

सूत्रसंचालन

प्रा. शैलजा माने, प्रा. साधना पाटील,प्रा.शिवानी क्षीरसागर

आभार

प्रा. डॉ.  देवानंद सोनटक्के

रयत शिक्षण संस्थेचे

# डी.पी.भोसले कॉलेज,कोरेगाव

पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग व

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर आयोजित

## 'लोकसंस्कृतीच्या उपासकांचे सांस्कृतिक, सामाजिक व वाङ्मयीन अधिष्ठान'

एक दिवसीय आंतरविद्याशाखीय मराठी राष्ट्रीय चर्चासत्र

सोमवार दि.२१ नोव्हेंबर २०२२

## प्रथम सत्र : विषय (स. ११. ते १२ )

### लोकसंस्कृतीच्या उपासकांचे कलाप्रकार व स्वरुप

साधनव्यक्ती

**मा. प्रा. डॉ. प्रमोद पवार**

(मराठी विभाग, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक)

☼

### लोकसंस्कृतीच्या उपासकांची सद्यस्थिती

साधनव्यक्ती

**मा. प्रा. डॉ. संजय बालाघाटे**

( अध्यक्ष, राष्ट्रीय भटक्या-विमुक्त जाती-जमाती महासंघ )

☼

अध्यक्ष

**मा. प्रा. डॉ. नंदकुमार मोरे**

( प्रमुख, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर )

सूत्रसंचालन

प्रा. डॉ. बळवंत मगदूम

आभार

उपप्राचार्य डॉ. सुनील जाधव

रयत शिक्षण संस्थेचे

# डी.पी.भोसले कॉलेज,कोरेगाव

पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग व

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर आयोजित

‘लोकसंस्कृतीच्या उपासकांचे सांस्कृतिक, सामाजिक व वाङ्मयीन अधिष्ठान’

एक दिवसीय आंतरविद्याशाखीय मराठी राष्ट्रीय चर्चासत्र

सोमवार दि.२१ नोव्हेंबर २०२२

## द्वितीय सत्र : दु. १२. ते १ वा.

## खुले शोध निबंध वाचन

## अध्यक्ष

## मा. प्रा. डॉ. दत्ता पाटील

( अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर )

## शोध निबंध वाचक

## सूत्रसंचालन :प्रा.डॉ.अशोक तवर

( प्रमुख,मराठी विभाग ,एल.बी.एस.कॉलेज , सातारा )

## आभार :प्रा. सचिन निकम

( प्रमुख, पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग )

सूत्रसंचालन

प्रा. डॉ देवानंद सोनटक्के

आभार

उपप्राचार्य डॉ. सुनील जाधव

भोजन अवकाश : ( दु.१ ते दु. २ )

रयत शिक्षण संस्थेचे,

# डी.पी.भोसले कॉलेज,कोरेगाव

## पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग

## 'लोकसंस्कृतीच्या उपासकांचे सांस्कृतिक ,सामाजिक व वाङ्मयीन अधिष्ठान'

## एक दिवसीय आंतरविद्याशाखीय मराठी राष्ट्रीय चर्चासत्र

सोमवार दि.२१ नोव्हेंबर २०२२

## तिसरे सत्र ( दु. २ ते ४ ) : कला सादरीकरण

| अ.क्र. | कलाप्रकार | साधनव्यक्ती |
|---|---|---|
| गणेश वंदन - साधनव्यक्ती : मा. चंद्रकांत बर्गे व सह कलाकार (चिंचणेर निंब ) | | |
| १ | जागरण गोंधळ | साधनव्यक्ती : मा. बबन जावळे व सह कलाकार (कठापूर ) |
| २ | लावणी नृत्य | साधनव्यक्ती : मा.अनिल झेंडे (कराड |
| ३ | वाघ्या मुरळी | साधनव्यक्ती : मा.प्रदीप पवार व सह कलाकार (पाली ) |
| ४ | लावणी नृत्य | साधनव्यक्ती : मा.कु. श्रृष्टी महेश जाधव , मा. कु. अनिता महेश पाटणकर |
| ५ | कडक लक्ष्मी | साधनव्यक्ती : मा.गंगाराम कोळी व सह कलाकार (अहमदनगर ) |
| ६ | पोतराज | साधनव्यक्ती : मा. बापू बागाव व सह कलाकार (जांब खु. ) |
| ७ | लावणी नृत्य | साधनव्यक्ती : मा.कु.आरती मोहन जावळे , मा.कु.सजना सर्जेराव जावळे |
| ८ | वासुदेव | साधनव्यक्ती : मा.गणेश पोटे व सह कलाकार (पाटस जि.पुणे ) |
| ९ | माणदेशी मेंढपाळ धनगर जमातीचे सुंबरान गीत | साधनव्यक्ती : मा.महादेव इरकर (विरार –मुंबई ) |
| १० | सात कलांचे सादरीकरण | साधनव्यक्ती : मा. स्वराज पाटील (कोल्हापूर ) |
| ११ | लावणी नृत्य | साधनव्यक्ती : मा.अनिल झेंडे (कराड ) |
| १२ | भारुड–कल्याणचा खजिना , बाळ्याच लगीन | साधनव्यक्ती : मा. चंद्रकांत बर्गे व सह कलाकार (चिंचणेर निंब ) |

### अध्यक्ष

### मा. प्रो. डॉ. सुवर्णा रावळ

(बी. एन. एन. कॉलेज, भिवंडी (मुंबई)) अध्यक्ष, भटके- विमुक्त विकास परिषद, महाराष्ट्र राज्य)

सूत्रसंचालन

प्रा.डॉ.देवानंद सोनटक्के

आभार

प्रा.डॉ .भगवान लोकडे

( प्रमुख ,पदवी व पदव्युत्तर इंग्रजी विभाग )